# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## सन २०२१-२०२२ या वर्षातील कार्याचा अहवाल
## [वर्ष ८७ वे]

**[प्रास्ताविक:- "बलम् राष्टस्य वर्धनम्" या उदात्त राष्ट्रीय ध्येयाने प्रेरित होऊन दि.२९ जून,१९३५ साली म्हणजे ब्रिटीश राजवटीत** मुंबई **शारीरिक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. संस्थेने आजवर अनेकविध उपक्रम राबवून शारीरिक शिक्षण व क्रीडाक्षेत्रासाठी वैशिष्टयपूर्ण असे योगदान दिलेले आहे. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाने सन १९७८ साली शारीरिक शिक्षण महाविद्यालयाची स्थापना केली आणि संपूर्ण देशात आपल्या कार्याचा ठसा उमठवला आहे. याचबरोबर संस्थेने क्रीडाप्रशिक्षण केंद्र, योग अभ्यास केंद्र, जिम्नॅस्टिक्स केंद्र, रिदमिक जिम्नॅस्टिक केंद्र, फिटनेस सेंटर तसेच मुंबई शारीरिक शिक्षण पुरस्कृत जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा, आंतरशालेय हिंद करंडक स्पर्धा, आंतरशालेय दत्ताराम लाड लेझिम स्पर्धा अशा अनेकविध उपक्रम मंडळाच्या वैशिष्टयपूर्ण कार्याची साक्ष पटवून देत आहेत.**

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा सन २०२१-२०२२ या वर्षातील कार्याचा अहवाल मंडळाच्या सभासदांना सादर करतांना नमुद करू इच्छितो की, कोव्हीड-१९ या जगभरात पसरलेल्या महामारीच्या प्रादूर्भावामुळे या अहवाल वर्षात संस्थेच्या / महाविद्यालयाच्या कार्यात अनेक अडथळे व अडचणी आल्या. अशा या प्रतिकुल परिस्थितीत संस्थेच्या अध्यक्षाच्या मार्गदर्शनाखाली संस्थेतील व महाविद्यालयातील सर्व कर्मचा-यांनी करोनाचा संयमाने, धीराने, मुकाबला करत अनेक कार्यक्रम राबविले त्या कार्याचा संक्षिप्त अहवाल पुढीलप्रमाणे-

### १. संस्थेच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे कार्य

सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षात प्रथमच कोरोना महामारीमुळे संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वर्गात, मैदानावर, शाळांमध्ये नेऊन सराव अध्यापन किंवा विविध उपक्रमांचे आयोजन, सहभाग या शिक्षक प्रशिक्षणासाठी अत्यंत आवश्यक असलेल्या गोष्टी हया ऑनलाईन पध्दतीने शिकविण्यात आल्या. टाळेबंदी/ संचारबंदी या दुष्टचक्रामुळे महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी बंद ठेवावे लागले. असे असले तरी अत्यंत प्रतिकुल अशा या परिस्थितीत शासन व विद्यापीठ यांचेकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांनी अनेकविध शैक्षणिक बाबी सक्षमपणे पार पाडल्या. त्याचा संक्षिप्त गोषवारा पुढीलप्रमाणे-

### १.१ स्वातंत्रदिनी ऑनलाईन ध्वजवंदन कार्यक्रम -

दि.१५ ऑगष्ट २०२१ रोजी टाळेबंदीमुळे ऑनलाईन पध्दतीने ध्वजवंदनाचा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी संस्थेचे जनरल सेक्रेटरी मा.श्री.दिपक बाबूराव शेटे यांच्या शुभहस्ते राष्ट्रध्वज फडकवून प्राचार्य डॉ.गो.वि. पारगांवकर व मा.श्री.दिपक शेटे यांनी आभासी माध्यमातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास संस्थेच्या विश्वस्थ मंडळाचे सदस्य श्री.संग्रामसिंह शेटे, श्री.अजिंक्य जाधव, पुणे व महाविद्यालयाचे सहय्यक प्राध्यापक डॉ.राजेंद्र ढाकणे, डॉ.नितू जोशी व डॉ.किशोर मारू इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

### १.२ सूर्यनस्कार

प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.घ.का. ढोकरट यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१८ जानेवारी २०२२ रोजी आजादी का अमृत महोत्सवात ७५ करोड सूर्यनमस्कारात सहभाग घेऊन बीपीएड सत्रातील सर्व विद्यार्थ्यांनी दररोज सकाळी १२ सुर्यनमस्कार घालून सकाळच्या सत्रास सुरूवात करत होती.

## १.३ प्रजासत्ताक दिनानिमित्त ऑनलाईन ध्वजवंदन कार्यक्रमाचे आयोजन

दि.२६ जानेवारी २०२२ रोजी संस्थेचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय शेटे यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय ध्वज फडकवून ध्वजवंदनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.दिपक शेटे, विश्वस्त मा.श्री.संग्राम शेटे व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते. त्यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.घन:श्याम का. ढोकरट व संस्थेचे सन्मा. अध्यक्ष मा. श्री. संजय बाबूराव शेटे यांनी सर्वांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

## १.४ ऑनलाईन अभ्यासक्रमातून संस्थेसाठी फंड निर्मिती

अहवालसाली महाविद्यालयाने 'गायो फिटनेस ॲकॅडेमी' यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई, विद्यापीठ मान्यताप्राप्त फिटनेस ट्रेनर व फिटनेस सेंटर मॅनेटमेंट प्रमाणपत्र अभ्यासक्रम देशात विविध ९ राज्यात ११ ठिकाणी म्हणजे मुंबई, दिल्ली, आसाम,(गोहाती), कलकत्ता, (त्रिशुल, कोची, कॅलीकट), मिझोराम (अपझॉल), बंगलोर, बेळगांव, गोवा, छत्तीसगड (रायपूर) येथे राबविण्यात आले त्यातुन संस्थेस अहवालसाली रू.२,५२,०००/- [दोन लाख एकोनपन्नास हजार फक्त]इतका निधी उपलब्ध झाला.

## १.५ शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ (सन२०२१-२०२२) -

कोरोना महामारीमुळे अहवालसाली प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्याने बीपीएड अभ्यासक्रमाच्या ४३ व्या व एमपीएड अभ्यासक्रमाच्या २४ व्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात ही नविन वर्षाच्या सुरूवातीस म्हणजे १६ फेब्रुवारी २०२२ रोजी झाली. त्यावेळी प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ.घन:श्याम का.ढोकरट यांनी सर्वांना सद्याच्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करून अभ्यासक्रम कसा पूर्ण करायचा याचे मार्गदर्शन सर्व विद्यार्थी व शिक्षकांना केले. उदघाटन कार्यक्रमाचे संयोजन डॉ.नितू जोशी (सहाय्यक प्राध्यापिका) यांनी उत्कृष्ठरित्या केले.

## १.६ आभासी शिक्षण पध्दतीचा अवलंब [ Virtual/ Online Education]

टाळेबंदीच्या सुरूवातीच्या काळात दि.१४ ते १९ फेब्रवारी २०२२ या कालावधीत सर्व शिक्षकांना आभासी वर्ग घेण्याचे तंत्र आत्मसात करण्यासाठी सहा दिवसांचा ऑनलाईन वर्कशॉप, ऑनलाईन एज्युकेशनल व्हिडोओ प्रोडक्शन कसे करावयाचे याचे प्रशिक्षण प्रा. मोनिन शेख यांच्याद्वारे देण्यात आले त्याचवेळी व्हॉटस् ॲप, इ-मेल या माध्यमातून अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत सुचविण्यात आले. सर्व शिक्षकांनी ऑनलाईन माध्यमातून विविध कार्यशाळा, चर्चासत्रे व सेमिनार यात भाग घेवून ऑनलाईन अध्यापनाचे तंत्र आत्मसात करण्यास सुरूवात केली. तसेच त्यावेळी दुस-या व चौथ्या सत्रात शिकत असलेल्या बीपीएड/एमपीएड अभ्यासक्रमाच्या [२०२०-२०२२ व २०१९-२०२१ बॅच] विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी नोटस् व तत्सम साहित्य ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध करून दिले.

## १.७ शिवजयंती उत्सवाचे आयोजन

अहवालसाली दि.१९ फेब्रुवारी २०२२ रोजी गेटवे ऑफ इंडिया येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त महाविद्यालयातील बीपीएड च्या ५० विद्यार्थी-विद्यार्थीनीद्वारे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास २१ सूर्यनमस्काराने मानवंदना देण्यात आली. सदर कार्यक्रमास बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौर सौ.किशोर पेडणेकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.इकबालसिंह चहल तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष श्री.किसनराव जाधव, सरचिटणीस श्री.संजय बाबूराव शेटे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.घनश्याम का. ढोकरट तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

## १.८ मराठी भाषा गौरव दिन -

अहवालसाली दि.२८ फेब्रुवारी २०२२ रोजी ज्येष्ठ लेखक व कवी श्री.वि.वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' चे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात बीपीएड अभ्यासक्रमाती विद्यार्थी /विद्यार्थीनीनी अनेक विध कार्यक्रम सादर केले. कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.घ.का. ढोकरट यांनी मराठी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले.

## १.९ अंधश्रध्दा निर्मुलन कार्यक्रमाचे आयोजन

अहवालसाली दि.७ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयातील बीपीएड अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांकरीता अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे श्री.नंदकिशोर तलाशिलकर व विजय परब यांच्या मार्गदर्शनाखाली अंधश्रध्दा निर्मुलन यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ.घ.का. ढोकरट व सर्व शिक्षक उपस्थित होते.

## १.१० आंतरराष्ट्रीय महिला दिन

अहवालसाली दि.८ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात महिला दिनानिमित्त बीपीएड अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना अनेकविध कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य प्रा.डॉ.घ.का. ढोकरट यांनी महिलांचे सामाजिक स्थान यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## १.११ एक सूर एक ताल

दि.१२ मार्च २०२२ रोजी युवक बीरादरीद्वारे आयोजित एक सूर एक ताल सह 'पुण्यतीर्थ भारत' कार्यक्रमात सहभाग.

## १.१२ झांज कवायतीच्या आंतरकुल स्पर्धांचे आयोजन

दि.२२ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयात झांज कवायतीच्या आंतरकुल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात प्रमुख पाहुणे श्री.दिपक शेटे, श्री.एन.बी.मोटे आणि डॉ.मन्मथ घरोटे हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धेचा निकाल जाहीर करून सर्वांचे अभिनंदन केले.

## १.१३ शैक्षणिक सहल

अहवालसाली दि.२५ मार्च २०२२ रोजी महाविद्यालयाचे बीपीएड सत्र-२ च्या विद्यार्थ्यांना विविध क्रीडा सुविधांचे ज्ञान मिळण्याकरीता श्री छत्रपती शिवाजी क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे १०० विद्यार्थी व शिक्षक यांच्यासह भेट देण्यात आली. सदरप्रसंगी क्रीडा संकुलातील मार्गदर्शक व स्टेडियम प्रबंधक यांनी सर्व सुविधांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. महाविद्यालयाच्यावतीने उपसंचालक श्री.आनंद व्यंकटेश यांचे आभार मानण्यात आले.

## १.१४ अग्नीशमन दिन

दि.१८ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालयात अग्नीशमन दिनानिमित्त बीपीएड व एमपीएड विद्यार्थ्यांकरीता स्वत:ची व इतरांची सुरक्षा कशी करावी याकरीता अग्नीशमन दलाचे श्री. ध्यैर्यशील जाधव यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

## १.१५ ऑनलाईन वेबिनार

अहवालसाली दि.२४ मे २०२१ रोजी ऑनलाईन माध्यमातून मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालय तसेच शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, इस्माईल युसुफ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय महिला क्रीकेटर श्रीमती

शिखा पांडे यांचे 'फेसिंग लाईफ चॅलेंजेंस माय जर्नी थ्रु पेनडामिक' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

### १.१६ आंतरराष्ट्रीय पेंटॅग्युलर डीयोबॉल चॅम्पीयनशीप

दि.२५ ते २७ मे २०२२ दरम्यान महाविद्यालयात प्रथमच आंतरराष्ट्रीय सामन्याचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय पेंटॅग्युलर डीयोबॉल चॅम्पीयनशीपचे उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यांनी उपस्थित मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे सन्मा.अध्यक्ष श्री.संजय शेटे, आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू युवराज वाल्मिकी, सर्व खेळाडू, अतिथी व आयोजकांचेही अभिनंदन केले.

### १.१७ एल एम एस प्रशिक्षण वर्गाचे आयोजन

नॅकच्या निकषानुसार अध्यापन पध्दती अधिक दर्जेदार व अद्यावत करण्यासाठी महाविद्यालयाने दि.२७ मे २०२२ रोजी एलएमएस प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले. सदर प्रसंगी महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यांनी आयोजकांचेही अभिनंदन केले.

### १.१८ लोकनृत्याचे आयोजन

दि.३१ मार्च २०२२ रोजी बीपीएड सेमीस्टर-३ च्या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आंतरकुल लोकनृत्यांचे आयोजन केले. महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यांनी सर्व विजेत्या संघाचे अभिनंदन केले. आयोजकांचेही अभिनंदन केले.

### १.१६ शारीरिक शिक्षण संशोधन केंद्राचे कार्य

अहवालसाली महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सुरू केलेल्या संशोधन केंद्रातून श्री.भंडारी महेंद्र या संशोधकांने आपले संशोधन कार्य प्रा.डॉ.घ.का.ढोकरट यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करून मुंबई विद्यापीठाची शारीरिक शिक्षण विषयाची विद्यावाचस्पती [पी.एच.डी.] पदवी प्राप्त केली आहे.

## २. शिक्षक सहभाग व विशेष कार्य-

### अ. शिक्षक सहभाग व विशेष कार्य

वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षकवृंदाने खालील विविध चर्चासत्रे, कार्यशाळा व परिषदांमध्ये भाग घेऊन शोधनिबंध सादर केले--

| Sr. No. | Name of the Teacher | Theme of the Seminar/Conference/Symposia please specify whether it was a Seminar/ Conference/Symposis as the case may be) | Name of the Organiser | Date & Place | Title of the Paper presented/read |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Dr.G.K. Dhokrat** | FDP on development E-Content | Org. By IASE Deemed to be University, Sadarshar, Rajasthan | Rajasthan, 1.7.21 to 7.7.21 | Participated |
| | | Delivered lecture to Primary and Secondary School Teacher. Invited as Resource Person(Science of Human Movement) | Org. By Rastriya Shikshan Sanstha, Swami Vivekanand Vidyamandir at Dr.Hegadewar Sabhagrah, Dombivli(W.) | Dombivli, 14.8.21 | Participated |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | International Conference on Physical & Exercise Science – 2021.<br>Invited as Chairperson for Technical Session | Org. by – IFPEFSSA Hyderabad, at Hotel Green Park, Begumpet, Hyderabad | Hyderabad, 5.12.21 | Participated |
| 1. | **Dr.R.C. Kawade** | Webinar on yoga upanishad | Lonavla yoga institute | Lonavla, 3.1.2022 to 11.03.22 | Participated |
| | | Webinar on yoga Siddha siddhanta paddhati | Lonavla yoga institute | Lonavla, 26.07.21 to 1.10.21 | Participated |
| | | Webinar on Hidden aspect of hatha yogic concepts mentioned in ancient hatha yoga texts | Lonavla yoga institute | Lonavla, 21.04.21 to 28.06.21 | Participated |
| | | 12 day online national workshop Enriching capacity building initiative for social science teachers in education | Department of physical education Mumbai university in collaboration with WRC ICSSR Mumbai | Mumbai 14.03.2022 to 28.03.2022 | Participated |
| | | H.R.D.C Ugc Sponsored Refresher Course Online | Lakshmi Bai National Institute Of Physical Education Gwalior | Gwalior, 18.03.2022 to 31.03.22 | Participated |
| 2 | **Dr.J.M. Hotkar** | Ethics & Values in Higher Education | Maharashtra State Faculty Development Academy Pune & Initiatives of Change-India | Asia Plateau, Panchgani, 14.2.22 to 18.2.22 | Participated |
| 3 | **Dr. N.O. Joshi** | Two Week National Inter-Disciplinary Refresher Course/ Faculty Development Programme on “Research Methodology and Data Analysis” was conducted by Teaching Learning Centre | Ramanujan College, University of Delhi under the aegis of Ministry of Education from | Delhi, 17.05.21 to 31.05.21. | Participated |
| | | One Week National Level Faculty Development Programme on Research in Multidisciplinary Studies | Shree HVP Mandal’s Degree College of Physical Education, Amravati | Amravati 30.11.21 to 4.12.21 | Participated |
| | | 12 Day Online National Workshop on “Enriching Capacity Building initiatives for Social Science Teachers | Dept of Physical Education, University of Mumbai & WRC/ICSSR | Mumbai 14.03.22 to 28.03.22. | Participated |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | in Higher Education was conducted | | | |
| **4** | **Dr.Chougule** | Participated in the National level one day e-workshop, | organized jointly by the Govt. of Maharashtra Ismail Yusuf College and Shri Ambika Yoga Kutir, Thane on the occasion of the International Yoga Day | Mumbai 21.6.2021 | Participated |
| | | National Webinar on Olympic Movement: Past, Present and Future | organized by Department of Physical Education The Maharaja Sayajirao University of Baroda | Baroda, 23.6.2021 | Participated |
| | | Paper Published with a title **Enhancing employability by stress management** for international interdisciplinary e-conference on "holistic approach of health science, research, sports science and yoga during 21st century" | organised online platform by the Department of Physical Education and Sports, Sadar Patel Mahavidyalaya, Chandrapur, Maharashtra | Chandrapur 6-7th August, 2021 | Participated |
| | | Paper Published with a **title "Impact of Covid-19 on Health in Post Recovery Phase"** on Global Environmental Health and sustainable Development, | Organised by the Gondwana University, Gudchiroli, Fepartment of Sports & Physical Education & Shri Dnyanesh Mahavidyalaya, Department of Sports & Physical Education & Internal Quality Assurance Cell (IQAC) | 20.8.2021 | Participated |
| **5** | **Dr.Maru K.J.** | Two Week National Inter-Disciplinary Refresher Course/ Faculty Development Programme on Research Methodology and Data Analysis | Teaching Learning Centre, Ramanujan College, University of Delhi under the aegis of Ministry of Education, | 17th May 2021 - 31st May 2021 | Participated |
| | | One Week National Level Faculty Development | Department of Physical Education, Shree HVP | 30th Nov. – 4th Dec.21 | Participated |
| | | Programme on Research in Multidisciplinary Studies | Mandal's Degree College of Physical Education, Amravati, Maharashtra | | Participated |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Refresher Course - Physical Education, Sports Sciences and Yoga) | ASC-HRDC Sant Gadge Baba Amravati University, Amravati | 17th August – 30th August 2022 | Participated |
| | | Refresher Course Faculty Development Programme & quot; Research Methodology for Social Sciences, Commerce and Management Sciences & quot; | UGC-HRDC Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore | 31st October – 05th November 2022 | Participated |

**ब.शिक्षकांद्वारे प्रकाशन कार्य :**

अहवालसाली महाविद्यालयाच्या खालील शिक्षकांनी खालील महत्वपूर्ण लेखन / प्रकाशन कार्य केले.

| | |
|---|---|
| 1 | **Dr.G.K. Dhokrat,** Study of Body Image among Female Adolescent Students based on Personality, Turkish Journal of Computer and Mathematics Education, SCOPUS Indexed Q4 Journal, Vol,12 No.12(2021), 1909-1912, dt.23.5.21 |
| | Role of Yoga Meditation in Examination Anxiety of Visually Impaired Child, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Impact:7.380 (SJIF) ISSN No. 2319-4766 Volume 10, Issue 48, July-Sept.2021 |
| | Effect of Yoga & Meditation on Body Image of Visually Impaired Students, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language Impact:7.278 (SJIF) ISSN No. 2349-9664 Volume 9/29, July-Sept.2021 |

| | |
|---|---|
| 1 | **Dr. N.O. Joshi**, A Study of Effect of Integrated Exercise Training Module on Motor Fitness Components of Volleyball Players Shodhsamhita, ISSN No. 2277-7067 Volume VIII, Issue 12 (VI), 2021-2022, Page Nos 226 - 244 with Impact factor 4.95 (Lalit Dhawde, Dr. Neetu Omprakash Joshi) |
| | A Study of Effect of Integrated Exercise Training Module on Psychological Parameters of Volleyball Players The Journal of Oriental Research Madras Volume XCII-XXXVI, 2021-2022, Page Nos 149 - 155 with Impact factor 4.95 (Lalit Dhawde, Dr. Neetu Omprakash Joshi) |
| | Effect of Integrated Exercise Training Module on the basis of Mental Health of Students with Anorexia Nervosa Disorder Shodhsamhita, ISSN No. 2277-7067 Volume VIII, Issue 12 (VI), 2021-2022, Page Nos 245 - 250 with Impact factor 4.95 (Ms. Dipali Patil, Dr. Neetu Omprakash Joshi) |
| 2 | **Dr.S.N Chougule,** Book Published : Contributions of BPCA to the fields of Physical Education, Sports and Allied Disciplines 2021 |
| | Paper Published with a title **Enhancing employability by stress management** for international interdisciplinary e-conference on "holistic approach of health science, research, sports science and yoga during 21st century" organised online platform by the Department of Physical Education and Sports, Sadar Patel Mahavidyalaya, Chandrapur, Maharashtra, Published in B. AADHAR – Peer Reviewed Multidisciplinary International refereed indexed Journal, ISSN: 2278-9308, Issue No. 313, March, 2021, Pp. 34-40. Issue No, |

| | |
|---|---|
| | 278 (CCLXXVIII) B Impact Factor – 7.675 (SJIF)., 6-7th August, 2021 |
| | Paper Published with a **title "Impact of Covid-19 on Health in Post Recovery Phase"** on Global Environmental Health and sustainable Development, Published in Journal of Research and Development A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal 20th August,2021, Volume-12, Issue 3, Impact Factor: 7.265, ISSN-2230-9578, 20th August, 2021. |
| | Paper Published with a title: Training of Athletes during Covid-19 Lockdown, Published in Vol.36,No.(IX) : 2021 Kalyan Bharati with ISSN: 0976-0822, UGC-Care List Group-I , Impact Factor-5.90, 29th August, 2021 |
| | Paper Published with a title: Nothing is Impossible in this World! Published in International Journal of Advance & Applied Research (IJAAR). ISSN 2347-7075. Impact Factor 7.328, Voume-9. Issue-3 , January-February, 2022 |
| | Participated in the 12 day Online –National Workshop on "Enriching Capacity Building Initiatives for Social Teachers in higher Education" organized by Department of Physical Education, University of Mumbai in collaboration with Indian Council of Social Science Research(WRC/ICSSR), Mumbai 14th-28th March, 2022 |

## क. शिक्षकांचे विशेष कार्य

| | |
|---|---|
| 1 | **Dr.G.K. Dhokrat,** Prof.H.N. Mishra College of Education, Kanpur, Member of Advisory Committee, 2021 |
| | Prof.H.N. Mishra College of Education, Kanpur, Member of Research Advisory Committee, 2021 |
| | Tumbe Group of International Journal, Appointed as Reviewer under the area Sports and Library Science, 2021-22 |
| | University of Mumbai, Apointed as Vice-Chancellors Nominee as Subject Expert for CAS Stage 1 to Stage 2 of M.L. Dahanukar College of Commerce, Vile Parle, Mumbai-57, dt.1.10.21 |
| | University of Mumbai, Apointed as Vice-Chancellors Nominee as Subject Expert for the panel of members of selection committee for the post of Assistance professor, dt.1.11.21 |
| | Incorporated Association, the academic society of south & north sports, republic of Korea, Researh fellow, dt.1st August 2020 to 31st July 2022 |
| 2 | **Dr.R.C. Kawade,** 750 million Surya namaskar challenge for 21 day's organized on the auspicious occasion or the 75th Anniversary of independence of India. Azadi ka amrut mohoschav. |
| | Field test expert for CET B.P.ED 4-10-2021 to 7-10-2021 and M.P.ED 16 - 09 2032 TO 18-09-2022 |
| | Mmber of B.P.ED AND M.P.ED SYLLABUS COMMETEE MUMBAI UNIVERSITY |
| | West zone handball men and women selection comeetee member Mumbai university year 2021 and year 2022. |
| | Faculty Induction Programme-03 (FIP-03) organized by the UGC-HUMAN RESOURCE DEVELOPMENT CENTRE, KUMAUN UNIVERSITY, NAINITAL as per UGC-HRDC rules and regulations from 24th February to 26th March, 2021. Participated in the course in online mode. |
| | Shikhar Puraskar 2021 awarded by Entire Research International Research Journal (Indexed and Peer Reviewed). |
| 3 | **Dr.N.O. Joshi,** Shri. Muktanand College Gangapur, Dist Aurangabad-431109 conducted National One-week Online Faculty & Student Development Program on Diet, Fitness & Stress Management in Covid-19 Pandemic. Was the invited speaker & presented on "Stress Management Eustress & Distress among |

| | |
|---|---|
| | Students & Faculty" on 22.06.21. |
| | Career Counselling Cell, Khagaijan College, Nagaon, Assam conducted National Webinar on "The Significance of Physical Education in Educational Institutes" on 27.06.21. Acted as Resource Person and presented on the topic " Stress Management for Achieving Personal and Professional Success during COVID-19 Pandemic". |
| | Tapi Valley Education Society's Dhanaji Nana Mahavidyalaya, Faizpur, Jalgaon on 6.05.22. Acted as Resource person and presented on the topic , "Status of Mental Health of College Students after COVID-19". |
| | Department of Physical Education, Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded conducted National Conference on 'Self Reliant India (Atmanirbhar Bharat)" on 22.02.22. Presented paper on " Implementation in Skill-Based Education in Self-Reliant India" |
| | Acted as Organizing Secretary of 7 Days Faculty Development Program on "Writing of Proposal & Research Thesis" from 18th Jan to 24th Jan, 2021 organized by Indian Teacher Education community in collaboration with B.P.C.A's College of Physical Education, Wadala, Mumbai-31 |
| | Appointed as Paper Setter B.Sc (Sc) IV Semester-Sports Sociology for National Sports University Imphal. |
| | Appointment as Moderator & Reviewer in MPED CET. |
| | Appointed as Paper Setter & Examiner for BPED & MPED Course -University of Mumbai. |
| | Appointed as Paper Setter & Examiner for MPED Sem.IV Educational Technology for Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |
| | Acted as Visiting Faculty to teach Research Methodology to Ph.D students of Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded |
| | Participated in the 750 million Surya namaskar Challenge for 21 days (Azadi Ka Amrit Mahotsav) |
| | Appointed as Field Test Expert for field Expert for Mah-M.P.Ed CET 2022 |
| | Field visit to Sports Complex Balewadi Pune with BPEd Students. |

## ३. विद्यापीठ परीक्षा निकाल

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात झालेल्या मुंबई विद्यापीठ परीक्षेत महाविद्यालयाच्या बी.पी.एड. या दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा [२०२०-२१] निकाल १००% लागला. तसेच एम.पी.एड. [२०२०-२०२१] [द्वितीय वर्ष] अभ्यासक्रमासाठी बसलेल्या २५ विद्यार्थ्यांपैकी २५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला.

तात्पर्य, दिवसेंदिवस मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचा गुणात्मक दर्जा उंचावत आहे. आजवर मंडळाच्या या महाविद्यालयातून तयार झालेले सुमारे ५,००० शिक्षक देशाच्या कानाकोप-यात अनेकविध शाळा-महाविद्यालयातून यशस्वीरित्या कार्य करीत आहे. आज १०० टक्के विद्यार्थ्यांना अग्रक्रमाने व प्राधान्याने नोक-या मिळत आहेत यावरून महाविद्यालयाची गुणवत्ता सिध्द होते. ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत भुषणावह व अभिमानास्पद आहे.

## ४. श्रध्दांजली:-

अहवालसाली मंडळाशी संबंधित तसेच देशभरातील ज्या नामवंत व थोर व्यक्तींचे निधन झाले, त्या सर्वांना मंडळाच्यावतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यात प्रामुख्याने श्रीमती शशिकला ओम प्रकाश सैगल, ज्येष्ठ भारतीय सिनेकलावंत(दि.४ एप्रिल, २०२१), श्री.

किशोर नांदलस्कर, ज्येष्ठ मराठी नाटय व सिनेकलावंत(दि.२० एप्रिल, २०२१), श्री. सोली सोराबजी, भारताचा माजी ऍटर्नी जनरल(दि.३० एप्रिल, २०२१), श्री.रोहित सरदाना, पत्रकार(दि.३० एप्रिल, २०२१), श्री.अजित सिंग, राष्ट्रीय लोक दल अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री(दि.६ मे, २०२१), श्री.सुंदरलाल बहुगुणा, चिपको चळवळीचे नेते आणि प्रख्यात पर्यावरणतज्ञ(दि.२१ मे, २०२१), श्री.देबू चौधरी, ज्येष्ठ भारतीय लेखक(दि.१ मे, २०२१), श्री. बिक्रमजीत कंवरपाल, भारतीय सिनेकलावंत(दि.१ मे, २०२१), श्री.किसन रूंगटा, भारतीय क्रीकेटपटू आणि व्यवस्थापक(दि.१ मे, २०२१), श्री.विनोदकुमार बंसल, भारतीय शिक्षणतज्ञ(दि. ३ मे, २०२१), श्री.जगमोहन, भारतीय सैनिक व राजकीय नेते(दि.३ मे, २०२१), आर.बालकृष्ण पिलाई, राजकीय नेते व सिनेकलावंत(दि.३ मे, २०२१), श्री.व्ही.कल्याणम, भारतीय स्वातंत्रसैनिक(दि.४ मे, २०२१), श्री.डिंको सिंग, माजी बॉक्सर व आशियाई क्रिडा स्पर्धा सूवर्णपदक विजेता(दि.१० जून, २०२१), श्री.मिल्खा सिंग, भारताचे महान धावपटू(दि.१८ जून, २०२१), श्री.राज कौशल, हिंदी चित्रपट निर्माता व दिग्दर्शक(दि.३० जून, २०२१), श्री.दिलीप कुमार, दिग्गज बॉलिवूड अभिनेता(दि.७ जुलै, २०२१), श्री.पी.के.वॉरियर, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आयुर्वेदिक वैद्य(दि.१० जुलै, २०२१), श्री.यशपाल शर्मा, दिग्गज क्रिकेटर(दि.१३ जुलै, २०२१), श्री.नंदू नाटेकर, दिग्गज भारतीय बॅडमिंटन खेळाडू(दि.२८ जुलै, २०२१), श्री.कल्याण सिंग, माजी मुख्यमंत्री उत्तर प्रदेश(दि.२२ ऑगष्ट, २०२१), श्री.सिध्दार्थ शुक्ला, हिंदी टेलिव्हीजन अभिनेता आणि बिग बॉस ३ विजेता (दि.२ सप्टेंबर, २०२१), श्री.ऑस्कर फर्नांडिस, वरिष्ठ कॉग्रेस नेता व राज्यसभा सदस्य(दि.१३ सप्टेंबर, २०२१), श्री.बाबासाहेब पुरंदरे, प्रसिध्द लेखक, इतिहासकार आणि पद्मविभुषण प्राप्त(दि. १५ नोव्हेंबर, २०२१), सिंधुताई सपकाळ, प्रसिध्द समाजसेवक आणि पद्मपुरस्कारप्राप्त(दि. ४ जानेवारी, २०२२), पंडीत बिर्जु महाराज, महान कथ्थक उस्ताद(दि.१७ जानेवारी, २०२२), श्रीमती लता मंगेशकर, भारताची सुप्रसिध्द गायिका(दि.६ फेब्रुवारी, २०२२), प्रवीणकुमार सोबती, बीआर चोप्रा यांच्या महाभारतातील भीमच्या भूमिकेसाठी लोकप्रिय असलेले(दि.७ फेब्रुवारी, २०२२), बप्पी लाहिरी, ज्येष्ठ गायक आणि संगितकार(दि.१५ फेब्रुवारी, २०२२), शेन वॉर्न, ऑस्ट्रेलियाचा महान क्रिकेटपटू(दि.४ मार्च, २०२२),

सर्व महान व्यक्तींच्या आत्म्यास चिरशांती लाभो अशी मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाच्यावतीने परमेश्वर चरणी प्रार्थना!!

## ५. आभार

कोरोना महामारीमुळे उद्‌भवलेल्या अतिशय प्रतिकुल प्ररिस्थितीत अनेक व्यक्ती आणि संस्था यानी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे संस्थेस आधार दिला. महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तसेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रूसा) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालय व संस्थेला अनुदानरूपाने आर्थिक सहकार्य मिळाले. मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचा उत्कर्ष आपणा सर्वांच्या विश्वासावर व आधारावर अवलंबून आहे, याची जाणीव मंडळाला सदैव आहे. बलशाली भारताचे स्वप्न उराशी बाळगून कार्य कारणा-या आणि अमृत महोत्सवी वर्षाकडून शताब्दी वर्षाकडे वाटचाल करीत असलेल्या आमच्या मुंबई शारीरिक शिक्षण मंडळास आपण भविष्यातही सहकार्य करावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,

दिपक बाबूराव शेटे
जनरल सेक्रेटरी,
मुंबई शारीरिक शिक्षण
मंडळ

# मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव वडाळा क्रॉस रोड, मुंबई-४०० ०३१.

## -: वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना :-

स.न.वि.वि.

मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाची ८७ व्या वर्षातील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.०९ ऑक्टोंबर, २०२२ रोजी सायंकाळी ५.०० वा. भारतीय क्रीडा मंदिर, पहिला मजला सभागृह, वडाळा, मुंबई- ३१ येथे घेण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील विषय:-

१. मागील दि.३० ऑक्टोंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.
२. मागील वर्षाचा [सन २०२१-२०२२ ] वार्षिक अहवाल मंजूर करणे.
३. मागील वर्षाचे [सन २०२१-२०२२ ] वार्षिक जमाखर्च व ताळेबंद तक्ता वाचून मंजूर करणे.
४. सन २०२२-२०२३ सालासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
५. सन २०२२-२०२३ चे अंदाजपत्रक वाचून मंजूर करणे.
६. कार्यकारी समितीच्या संमतीने आलेल्या सूचनांचा विचार करणे व अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळेस येणारे इतर विषय.

सूचना:-

१. गणसंख्येच्या अभावी सदर सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी तहकुब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटांनंतर सुरू होईल. अशाप्रकारे तहकुब होवून सुरू झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता रहाणार नाही.

२. ज्या सभासदांना सर्वसाधारण सभेपुढे सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी सभेपुर्वी पाच दिवस अगोदर सूचक अनुमोदकाच्या सहीनिशी मंडळाच्या कचेरीत लेखी पाठविण्याची कृपा करावी. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

३. सर्व सभासदांना ८७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस पाठविली आहे. ८७ वा वार्षिक अहवाल संस्थेच्या कार्यालयातून कामकाजाच्या वेळेत घेण्यात यावा.

दिनांक: १८ सप्टेंबर २०२२

आपला नम्र,

[श्री.दिपक बाबुराव शेटे]
प्रमुख कार्यवाह

स्थळः कचेरी, भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा क्रॉस रोड, वडाळा, मुंबई-400031